Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# पंडित जवाहर नेहरू यांचे अलिप्ततावाद संबंधीचे विचार

**प्रा. डॉ. हरिश्चंद्र जनार्दन चौधरी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,( पदवी व पदव्युत्तर)
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

## प्रस्तावना

15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. अनेक वर्षापासून पारतंत्र्यात असलेला राष्ट्राची जागतिक राजकारणात कोणतीच भूमिका नव्हती. नुकतेच द्वितीय महायुद्ध संपले होते. अशावेळी भारताने कोणते धोरण स्वीकारावे, भारतीय समाजासाठी व राजकीय विकासासाठी कोणते धोरण असावे, या दृष्टीने भारताच्या परराष्ट्र धोरणाची मांडणी केली व ज्यांच्या परराष्ट्र धोरणाला वगळून पुढे जाऊ शकत नाही असे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जागतिक राजकारणात अलिप्तवाद धोरणाचा स्वीकार केला.

द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात दोन महाशक्ती उदयास आल्या होत्या. तसेच अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली होती.अशा नवस्वतंत्र राष्ट्रांनी कोणत्या गटात जावे हा प्रश्न निर्माण झाला.अशा वेळी मित्रराष्ट्रांना सोबत घेऊन जागतिक राजकारणात अलिप्ततावादी धोरणाची मांडणी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात पंडित नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणाची मांडणी करणे हा उद्देश आहे.

**उद्दिष्टे :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी खालील उद्दिष्टे समोर ठेवून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली जाणार आहे.

1) तत्कालीन जागतिक राजकारणाची पार्श्वभूमी पाहणे.
2) अलिप्ततावादाचा अर्थ स्पष्ट करणे.
3) अलिप्ततावादाची तत्वे पाहणे .
4) आदित्यचावादाची वैशिष्ठ्ये अभयासणे .
5) अलिप्ततावादाची उद्दिष्ट्ये अभ्यासणे
6)भारताने स्वीकारलेल्या अलिप्तता वादाचे कारणमीमांसा करणे.

### 1) तत्कालीन जागतिक राजकारणाची पार्श्वभूमी :-

1945 ला द्वितीय महायुद्धाची समाप्ती झाली. जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया या दोन महाशक्ती उदयास आल्या. या दोन्ही महाशक्तींनी आपले राजकीय व लष्करी सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न सुरू केला. याच वेळी जगात अनेक राष्ट्र स्वतंत्र झाली.अशा नव स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न हे दोन्ही महाशक्ती करू लागले.

अमेरिका व रशिया हे दोन्ही बलशाली राष्ट आपल्या गटाकडे नव स्वतंत्र राष्ट्रांनी सहभागी व्हावे यासाठी प्रयत्न सुरू केले. अमेरिका व रशिया या दोन्ही महाशक्तींना लष्करी गटाची स्थापना केली. अमेरिकेने नाटो, सीटो व सीएटो यासारख्या लष्करी गटाची स्थापना केली. तर रशियाने वार्सा या लष्करी गटाची स्थापना केली. आपल्या गटात सहभागी होणाऱ्या राष्ट्राची संरक्षण करण्याची जबाबदारी या गटाच्याद्वारे या महाशक्तींनी घेतली.

या दोन्ही महाशक्तीच्या गटात सहभागी न होता स्वतःचा विकास साध्य करताना आवश्यक असेल तेव्हा या दोन्ही महाशक्तींचे सहकार्य घ्यायचे व राष्ट्राचा विकास साध्य करावयाचा हा विचार पंडित नेहरू व त्यांची जागतिक क्षेत्रातील मित्र युगोसलावहियाचे अध्यक्ष मार्शल टिटो,इजिप्तचे नासेर व इंडोनेशियाचे सोकर्णो यांनी घेतली व अमेरिका व रशिया या गटात सहभागी न होता स्वतंत्र अशा अलिप्ततावादी गटाची स्थापना केली गेली.

### 2) अलिप्ततेचा अर्थ :-

द्वितीय महायुद्धानंतर जगात दोन महाशक्ती निर्माण झाल्या. अमेरिका व रशिया या दोन्ही महाशक्तीने आपले लष्करी गट स्थापन केले. याच सुमारास अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. या स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आपल्या गटात ओढण्याची स्पर्धा अमेरिका व रशिया या दोन महाशक्तीत सुरू झाली.काही राष्ट्रे या दोन्ही गटात सहभागी झाली नाहीत

व त्यांनी अलिप्ततावाद गट नावाची संघटना निर्माण केली पंडित नेहरू यांनी अलिप्तता वादाचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले "अलिप्ततावाद म्हणजे दोन्ही गटात सहभागी न होणे याचा अर्थ तटस्थ राहणे नव्हे. तर दोन्ही गटात सहभागी न होता दोन्ही गटाकडून सहकार्य घेऊन विकास साध्य करणे होय तसेच जर एखादा गट एखाद्या राष्ट्रावर अन्याय करत असेल. तर अन्याय होणाऱ्या राष्ट्राची बाजू घेऊन अन्याय करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध संघर्ष करणे म्हणजे अलिप्ततावाद होय."

### 3) **अलिप्ततावादाची तत्वे :-**

जागतिक राजकारणात दोन महाशक्तीचा उदय झाला. तसेच अनेक राष्ट्र स्वतंत्र झाली.भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्र स्वतंत्र झाली. पाकिस्तान अमेरिकेच्या लष्करी गटात सहभागी झाला.दोन्ही महाशक्ती च्या संघर्षातून जगाला वाचवायचे असेल तर अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कार केला गेला.

द्वितीय महायुद्धानंतर निर्माण झालेल्या जागतिक पातळीवर गट राजकारणाच्या पार्श्वभूमीवर अलिप्ततावादाची भूमिका निश्चित झाली असली तरी अलिप्ततावादी विचारांचा उगम हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत विकसित झालेला व इ.स. 1947 मध्ये दिल्लीत झालेल्या आशियाई राष्ट्राच्या पहिल्या परिषदेत नेहरूंनी केलेल्या भाषणात सापडतो. त्यात ते म्हणतात "आजपर्यंत कित्येक आशियाई राष्ट्रांना पाश्चात त्यांच्या दरबारात आश्रितासारखी वागणूक मिळाली आहे. मात्र आता हे देश आपल्या पायावर उभे राहून आपणास इथे सहकार्य करू इच्छितात त्यांच्याशी ते सहकार्य असते तयार आहेत."

वरील विधानाचा अर्थ लक्षात घेऊन नेहरूंनी मार्शल टिटो, नासेर सुकर्णो यांच्या सहकार्याने दोन्ही गटात सहभागी न होता अलिप्तपणे जागतिक शांततेचा तसेच साम्राज्यवाद व वसाहत वादाला विरोध करून आपले आशिया खंडातील पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्रांना स्वतंत्र करण्यासाठी आणि नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना आर्थिक सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी अलिप्तता वादात गटाची निर्मिती केली. अलिप्ततावादी चळवळीची जी मूलभूत तत्वे निश्चित केली त्यातील प्रमुख तत्वे खालील प्रमाणे आहेत.

1) अलिप्ततावादी राजकारणात स्वतःच्या राष्ट्रीय हितास अनुसरून स्वतंत्र दृष्टिकोन ठेवणे व त्याप्रमाणे घडणाऱ्या गोष्टींचे मूल्यमापन करून निर्णय घेणे.
2) वसाहतवाद व साम्राज्यवादास विरोध करणे.
3)आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील वादग्रस्त प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा आग्रह धरणे.
4)निःशस्त्रीकरणाचा विशेषतः महासत्तांचा मी निःशस्त्र करण्याचा आग्रह धरून युद्धमय वातावरण कमी करण्याचा प्रयत्न करणे.
5) बरोबरीच्या नात्याने सर्वांशी मैत्री करणे.
6) जागतिक शांतता ही सर्वांच्या विकासासाठी आवश्यक आहे असा विश्वास बाळगणे.

अलिप्ततावादी गट किंवा चळवळीने वरील प्रमाणे मुलतत्वे निश्चित केली असून गटनिरपेक्ष धोरणातून आंतरराष्ट्रीय शांतता स्थैर्य व विकास यासाठी याच धोरणाचा स्वीकार करून सर्व राष्ट्रातील मैत्रीचे व सलोख्याचे संबंध निर्माण केले.

### 4) **अलिप्तता वादाची वैशिष्ट्ये :**

अलिप्तता वादाची काही वैशिष्ट्ये खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

#### 1) **कोणालाही लष्करी गटात सहभागी न होणे** : -

द्वितीय महायुद्धानंतर जगाची विभागणी अमेरिका व रशिया या दोन गटात झाली या दोन्ही महाशक्तींनी स्वतच्या लष्करी गटाची स्थापना केली. अमेरिकेने नाटो,सिटो,सीएटों या लष्करी संघटना तर वार्सा ही लष्करी संघटना रशियाने स्थापन केली.या दोन्ही महाशक्तीतील स्पर्धेमुळे शीतयुद्धाचे वातावरण तयार झाले होते. अशावेळी अलिप्ततावादी गटाची स्थापना होऊन तिसरी जग निर्माण केले या अलिप्ततावादी गटाने लष्करी मैत्रीला विरोध केला परंतु शांततेसाठी बिगर लष्करी मैत्रीचे समर्थन केले.

#### 2) **स्वतंत्र धोरण** :-

स्वतंत्र धोरण हे अलिप्ततावादी गटाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.याचा अर्थ अलिप्ततावादी राष्ट्रे आपली स्वतःची अस्मिता कायम ठेवतील दोन्ही महासत्तांच्या दडपणाखाली ही राष्ट्रीय येणार नाहीत इ.स. 1947 ला आशियाई परिषदेत नेहरूंनी आपली भूमिका स्पष्ट केली होती ते" म्हणतात पाश्चात्यांच्या न्यायालयात अर्ज करणारे आम्ही अर्जदार नाहीत."

3) **जबाबदारी स्वीकारणे :-**

पंडित नेहरू म्हणतात “अलिप्ततावाद म्हणजे कोणत्याही प्रकारच्या आंतरराष्ट्रीय जबाबदारीतून अंग काढून घेणे नव्हे आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या स्वीकारण्यात भारताने नेहमीच आपली अग्रेसर भूमिका ठेवली. उदा. कोरिया ,लाओस ,व्हिएतनाम कांगो, सायप्रस, दक्षिण आफ्रिका या देशांच्या विविध समस्या विषयी भारताने नेहमीच जबाबदारीची भूमिका स्वीकारलेली दिसून येते.

4) **जागतिक शांतता हे ध्येय :-**

कायमस्वरूपाची जागतिक शांतता प्रस्थापित व्हावी हे अलिप्तता वादाचे ध्येय आहे भारताने याच भूमिकेचा स्वीकार केला याच ध्येयाने भारताने अनेक नव स्वतंत्र झालेल्या आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रांचे सहकार्य घेऊन जागतिक शांततेसाठी प्रयत्न केले.

5) **पलायन वाद नाही :-**

अलिप्ततावाद म्हणजे सर्व जागतिक घडामोडी पासून दूर राहणे नव्हे कोणत्याही करार संघटनेत सहभागी न होता सहकार्य करणे मैत्री करणे.

6) **गटबाजी नाही :-**

अलिप्त राष्ट्रगट असा शब्द जरी वापरण्यात येत असला तरी प्रत्यक्षात या चळवळीचा गटबाजीचा राजकारणास विरोध आहे गट हा शब्द पंडित नेहरूंना आवडत नव्हता. सर्व प्रकारच्या गटबाजीला त्यांचा विरोध आहे.

7) **वंशवाद,साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध :-**

अलिप्ततावादी चळवळीने वंशवादी राजकारणास विरोध केला दुसऱ्या महायुद्धा पूर्वी हिटलर आणि मुसोलिनी यांनी वंशवादाचा पुरस्कार केला होता यावर पंडित नेहरू यांनी आपल्या अनेक लिखाणातून त्यावर टीका केली होती तसेच साम्राज्यवाद, वसाहतवाद यासही अलिप्ततावादी चळवळीने विरोध केला.

8) **शस्त्रास्त्र स्पर्धेत विरोध : -**

अलिप्ततावादी चळवळीने देशा देशातील होणाऱ्या तीव्र शस्त्रास्त्र स्पर्धेला विरोध केला. नि:शस्त्रीकरणाचे जेवढे काही प्रयत्न झाले त्या प्रयत्नांना व अंमलबजावणीला अलिप्तवादाने समर्थन दिले दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्बचा झालेला वापर व त्याने केलेल्या विध्वंस यामुळे अण्वस्त्र मुक्त जग निर्माण करण्याचा प्रयत्न अलिप्ततावादी चळवळीतील देशांनी केला.

5) **पंडित नेहरूंचे भारताच्या संदर्भातील अलिप्तता वादाचे उद्दिष्टे -**

अलिप्ततावादी चळवळ ही जागतिक चळवळ आहे पंडित नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करताना अलिप्तता वादाची उद्दिष्टे निश्चित केली ती उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1) भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधाचे रक्षण करणे.

2)राष्ट्रीय हितसंबंधाचे रक्षणासाठी व जागतिक शांतता टिकविण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

3)आंतरराष्ट्रीय शांतता टिकवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटने सारख्या संस्थेला सहकार्य करणे.

4)जागतिक शांतता धोक्यात येऊ नये म्हणून राष्ट्रा - राष्ट्रातील वाद शांततेच्या मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न करणे स्वत:ही याच मार्गाचा पुरस्कार करणे.

5)शांततेची संवर्धन करण्यासाठी कोणत्याही लष्करी राजकीय गटात सहभागी न होता अलिप्त राहणे.

6) बड्या सत्तांच्या राजकीय, लष्करी संघर्षात न गुंतता त्यांच्याशी मैत्रिचे व सहकार्याचे संबंध ठेवणे.

7) राष्ट्रकुल या आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थेची पारंपारिक संबंध टिकविणे व त्यांच्याशी विधायक चर्चा करणे.

8) साम्राज्यवादास विरोध करणे व बळी पडलेल्या राष्ट्रांना सहकार्य करणे.

9) भारताच्या शेजारील राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध ठेवणे व ते दृढ करणे.

10) जागतिक शांतता टिकवण्यासाठी शस्त्र कपात योजनेमध्ये सर्वतोपरी सहाय्य करणे.

6)**भारताने स्वीकारलेल्या अलिप्ततावादी चळवळीतील पंडित नेहरूंचे धोरण**

पंडित नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणात अलिप्तता वादाचा स्वीकार केला जगाची विभागणी परस्परविरोधी घटना होतात परस्पर सहकार्य व स्नेहभाव वाढवा व जागतिक शांतता प्रस्थापित करून अलिप्तवादी चळवळीत सहभाग घेतला पंडित नेहरूंनी अलिप्ततावादी चळवळीच्या धोरणाचा

स्वीकार करून भारताला विकासाकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न पंडित नेहरूंनी केला.

वरील सर्व विश्लेषणावरून पंडित नेहरूंचा अलिप्ततावादी चळवळीचे निष्कर्ष खालील प्रकारे स्पष्ट करता येतील.

**निष्कर्ष :-**

1)तत्कालीन जागतिक राजकारणातील दोन महाशक्तीच्या तणावातून अलिप्ततावाद गट निर्माण करून पंडित नेहरू व त्यांच्या सहकार्यांनी तिसऱ्या जगाची निर्मिती केली.

2)दोन्ही महाशक्तीत सहभागी न होता सहकार्य मिळवून राष्ट्रीय हित साध्य करणे.

3) आंतरराष्ट्रीय शांतता हे मूलतत्त्व अलिप्तता वादाचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) वा.भा. पाटील - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत - प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.

2) बोराळकर क्रृ. दि – आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत – पिंपळपुरे पब्लिशर्स ,औरंगाबाद.

3) भोळे . भा. ळ- आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत – पिंपळपुरे प्रकाशन , नागपूर.